नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०७/२०२६ (शनिवार )

## अतिवृष्टीच्या आणि पुर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलिसांच्या उपाययोजना तसेच पोलीसांनी केलेले बचावकार्य

संभाव्य अतिवृष्टी व पूरस्थिती लक्षात घेऊन नागपूर ग्रामीण पोलीस दलाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात सर्वंकष नियोजन केले आहे. जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून, पूरप्रवण भाग, नदी—नाले, धरण परिसर, पूल व पाण्याखाली जाणारे रस्ते यांची नियमित पाहणी करण्यात येत आहे.

आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी विशेष पथके, आवश्यक मनुष्यबळ व वाहनांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन, महसूल विभाग, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, आरोग्य विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय ठेवून बचाव व मदतकार्याचे नियोजन करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक बचाव साहित्याची पाहणी करण्यात आली. लाईफ जॅकेट, लाईफ बॉय, दोरखंड, रेस्क्यू किट, रेन गिअर, गमबूट तसेच इतर आवश्यक उपकरणे सज्ज ठेवण्यात आली असून, आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ बचाव व मदतकार्य करता यावे यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आली आहे. धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स, चेतावणी फलक व पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली असून, नागरिकांना पाण्याचा प्रवाह असलेल्या रस्त्यांवरून वाहन चालवू नये, पूरग्रस्त भागात जाणे टाळावे तसेच हवामान विभाग व प्रशासनाने जारी केलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कोणतीही आपत्कालीन माहिती मिळाल्यास तातडीने पोलीस

हेल्पलाईन ११२ किंवा जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन नागपूर ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

पोलीस स्टेशन वडोदा :– अतिवृष्टीमुळे वडोदा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा खेडी, परसोडी व अडका गावांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. दिनांक २८/०७/२०२६ रोजी खेडी गावातील नाग नदीच्या पाण्यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना सुरक्षीत ठिकाणी हालविण्यात आले. तसेच सदर ठिकाणी नागरिकांना अवाश्यक सुचना देण्यात आल्या.आज पुन्हा सदर ठिकाणी भेट देवुन नागरिकांना सुचना देण्यात आल्या तसेच आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. दिनांक २९/०७/२०२६ रोजी महालगाव ते आसोली शिवारस्त्यालगत नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अडथळ्यामुळे शेतांमध्ये पाणी साचल्याची माहिती मिळताच वडोदा पोलीसांनी तहसीलदार, कामठी यांच्या समन्वयाने जेसीबीच्या साहाय्याने नाली खोदून पाण्याचा प्रवाह नाग नदीकडे वळविण्यात आला. त्यामुळे शेकडो एकरांवरील धान पिकाचे संभाव्य नुकसान टळले असून, स्थानिक शेतकऱ्यांनी पोलीस व प्रशासनाचे आभार व्यक्त केले.



 

पोलीस स्टेशन मौदा :—आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी अतिवृष्टी व संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन मौदा येथे पोलीस पाटील यांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत पूरप्रवण गावांवर विशेष लक्ष ठेवणे, पाण्याची पातळी वाढल्यास तात्काळ पोलीस व महसूल प्रशासनाला माहिती देणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यासाठी सहकार्य करणे तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.




सावधान !
पावसाळ्याच्या काळात नदीच्या पाण्याची
पातळी अचानक वाढू शकते..
• नदीपात्रात जाणे धोकादायक आहे.
• नदीत पोहणे, कपडे धुणे किंवा जनावरे नेणे टाळावे.
• लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवावे.
• पूरस्थितीत नदीकाठी गर्दी करू नये.
आपली सुरक्षितता आपल्या हातात आहे.




# खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली सदोष मनुष्यवधाची शिक्षा

**पोलीस स्टेशन कन्हान** :– पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्र. ९०/२०१७ कलम ३०२, ३२३, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, सदर गुन्हयातील यातील फिर्यादी नामे सौ. मिना अजय नितनवरे, वय २८ वर्ष, रा. केरडी, ता. पारशिवनी हिची जाऊ नामे सौ. प्रियंका नितनवरे हिला यातील आरोपी नामे रोशन रघुनाथ नितनवरे, वय ४५ वर्ष, रा. केरडी, ता. पारशिवनी यांनी जागेच्या व घरासमोर जनावरे बांधण्याच्या कारणावरून प्रथम शिवीगाळ करून काठीने मारले व नंतर तिचा जीव घेण्याचे उद्‌देशाने जळता दिवा तिचे अंगावर फेकला. त्यामुळे मृतक गंभीररित्या जळाल्याने तिचा मृत्यृ झाला.

**तपासी अधिकारी श्री देवानंद लोणारे, सहायक पोलीस निरीक्षक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २९/०७/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं १९ श्री व्ही. व्ही. मुंगळीकर यांनी नमुद आरोपी नामे रोशन रघुनाथ नितनवरे, वय ४५ वर्ष, रा. केरडी, ता. पारशिवनी यास कलम ३०४(१) भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/— रूपये दंड , दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री आर बी भोयर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. वैजयंती मांडवधरे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कन्हान, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री रामदास कोराम, ब.नं २२४ , नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पो.अं. ईश्वर हुड, ब. नं. २३५० पोलीस स्टेशन कन्हान यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ०५ लाख ०३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २८/०७/२०२६ रोजी मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा नानादेवी शिवार येथे नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४०/सी.क्यु— ३५३३ सोबत सलग्न असलेली विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आले. वाहन चालक आरोपी नामे **१) निलेश बंडु ठाकरे, वय २६ वर्ष, रा. किरनापुर हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक नामे **२) सुरज त्र्यंबक**

**नागमोते, वय २६ वर्ष, रा. किरनापुर** अशी माहिती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर **नमुद १) ट्रॅक्टर क्र. एम.एच. ४०/सी.क्यु– ३५३३ आणि विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ५,००,०००/–रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ३,०००/– रूपये असा एकुण ५,०३,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक १) निलेश बंडु ठाकरे, वय २६ वर्ष, रा. किरनापुर २) सुरज त्रयंबक नागमोते, वय २६ वर्ष, रा. किरनापुर यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८), महा. जमीन महसुल अधि. कलम ४, २१ खाण आणि खनिज अधि., कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २८/०७/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा नवरगाव कॉलनीत रामटेक येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) दिनेश नारायण बादुले, वय ४६ वर्ष, रा. बोरी, त. रामटेक २) उमेश घनश्याम साहारे, वय ४० वर्ष, रा. बोरी, त. रामटेक ३) बंडुभाउ भगवान नगरारे, वय ५७ वर्ष, रा. बोरी, त. रामटेक ४) विरू श्रावण गिरी, वय ४५ वर्ष, रा. घोटीटोक, त. रामटेक यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ८२००/—रूपये असा एकुण ८२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०६ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी १) राजेश रामदास धुर्वे, वय २१ वर्ष, रा. उमरी, खापा, ता. सावनेर २) आकाश विठठल धुर्वे, वय ३० वर्ष, रा. कोराडी फुले नगर,

नागपुर ३) शिवेंद्रकुमार जितेद्रसिंग ठाकुर, वय २१ वर्ष, गोपालपुर धुमका राजनंदगाव छत्तीसगड, ह. मु. उमरी शिवलींग, ता. सावनेर, जि. नागपूर हे मौजा वाकी दरबार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी नामे हिमांशु गजानन संतापे, वय २१ वर्ष, वार्ड नं. ०३, वैशाली नगर, कळमेश्वर, ता. कळमेश्वर हा मौजा कापुस जिन ब्राम्हणी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत आरोपी नामे १) हिरालाल धन्नुलाल पडोलिया, वय ५६ वर्षे, रा. डोंगरगाव, ता. काटोल हा अण्णा भाउ साठे नगर, तळाची पार, काटोल येथे तसेच २) बापुराव चिरकुटराव उईके, वय ७१ वर्षे, रा. अर्जुन नगर काटोल हा ऋषी तलाव तळाची पार, काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक २८/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ५,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) गणेश गंगाराम अवजेकर, वय ५५ वर्ष, रा. सर्वोदय नगर, ता. सावनेर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी परशुराम नरसीम्हा वोल्लरवार, वय ५८ वर्ष, रा. डोरली भिंगारे, ता. काटोल याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी विनायक श्रीराम नेवारे, वय ५४ वर्ष, रा. घरकुल कॉलनी खापा, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी पंकज मुकुंदा पोटभरे, वय ४० वर्ष, रा. स्नेह नगर मौदा, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा येथे** आरोपी १) अशोक सुर्यभान बारसागडे, वय ४९ वर्ष, रा. सावळी, ता. कामठी २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही येथे** आरोपी महेश निलकंठ

मारबते,वय ३४ वर्ष, रा. माजरी, ता. कुही, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे** आरोपी बबलु गजानन ताकोद, वय ५० वर्ष, रा. कान्द्री वस्ती, त. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली येथे** आरोपी १) राजेश बुकनसिंग नकोरीया, वय ४९ वर्ष, रा. इंदोरा, ता. मौदा २) बादल सुभाष भोयर, वय ३२ वर्ष, रा. मोरगाव, ता. मौदा, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ७३० मिली देशी दारू, २९ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ५,८९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने